# मनतरंग - २

माणूस म्हंटलं, की अडी-अडचणी, चिंता-काळज्या, ताण-तणाव हे सगळं ओघाने आलं....पण अशाही वेळांना आपण आपला दृष्टीकोन सकारात्मक ठेवला, तर त्या चिंता-काळज्यांची बोच जरा कमी होते. मला माझ्या एका मित्राने मध्यंतरी सहज एक नेहमीचाच प्रश्न विचारला...म्हणाला, “कशी आहेस सांग !” मी माझ्याहीनकळत सगळे वैताग-पाढे वाचले. कविताही लिहीली...ती पण अशीच आयुष्याचे रडगाणे सांगणारी..बोचरी !!

पण मग एकदम वाटले की मला त्याला असेही उत्तर देता आले असते की! थोडेसे सकारात्मक... शेवटी सुखं आणि दुःखं या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. फक्तं नाणे उलटे करून बघायची देरी असते. तर काय..अजून एक कविता..हसरी नाचरी !!! आणि मग मनावरचे मळभ जाऊन एक नवीन चैतन्य मिळाले.

तुम्हीच बघा कुठली कविता मनाला जास्त भिडते ती. कविता म्हणजे काय...एक विचारच ना...कुठला विचार भावतोय बघा.

कशी आहेस ते सांग?
डोक्यात प्रश्नांची मोठ्ठी रांग!
वेगवेगळ्या कोड्यांचे,
वळवळतात किडे....
मेंदूचा होतो भुगा,
पण सुटत नाहीत तिढे !
कशा-कशाचे सांग-
ओझे वाटून घेऊ?
श्वास होतोय जड....
म्हणून स्वतःस मिटून घेऊ??
क्षणा-क्षणाने आयुष्याची
होतेय वजाबाकी...
कसले गणित मांडू...
अन त्रासू फुकाफुकी ?
रडायचेच झाले तर
कोरडे सुद्धा रडता येते,
पापणीस कशाला थेंबाचा भार?
असे म्हणून अडता येते!

जाऊदे !
तू विचारलेस, मी सांगितले..
उरलेले गंगेला मिळाले..
सगळ्यांचे हे असेच आहे...
शोधायचे काय निराळे ????

---

कशी आहेस ते सांग?
अरे फ़िटले बघ नशीबाचे पांग!
डोळ्यांत एक सुद्‍धा नाही आसू,
ओठांवर फक्त गोड-गोड हसू...
हृदयाचे ठोके बघ कसे..
ताला-सुरांत धडधडतायत...
छान-छान स्वप्न बघत,
मनाचे पंख फडफडतायत !
अडचणी-बिडचणी ??
मारो यार गोली...
अभी अभी जलायी हमने..
बुराई की होली !!!
आला क्षण आंजारत-गोंजारत,
मी वाटचाल करणार..
नव्या जोमाचे नवे गाणे,
सारखे गुणगुणणार.....
कवितेलाही बघ माझ्या
फ़ुटतायत आता धुमारे...
शब्दच माझी शक्ती,
अन शब्दच सारे किनारे

**- प्रीती देशपांडे**

**www.meetipreeti.com**